**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**,
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL- 5/25*

# मराठी माध्यमाच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानात्मक पातळीवर विकसित झालेल्या मराठी भाषेतील शब्दसंपत्तीचे विश्लेषण करून त्यांचा तुनात्मक अभ्यास

**अतुल प्र. कुलकर्णी, Ph. D.**

*विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे*

***Abstract***

*श्रवण, भाषण, वाचन व लेखन या भाषेच्या मुळ क्षमता होत. या टप्प्यांमधूनच भाषेचा विकास होत असतो. या सर्व क्षमतांच्या मुळाशी शब्दक्षमता ही एक उपक्षमता आहे. आशयातील योग्य शब्द निवडून काढणे किंवा वापरणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शब्दसंपत्ती अधिक असेल तेवढी शब्दनिष्ठ सर्जनशीलता अधिक असते. शब्दसंपत्तीच्या अभावामुळे विद्यार्थी स्वत:च्या विचारांना योग्य न्याय देऊ शकरणार नाही. शब्दसंपत्तीवर प्रभूत्त्व येण्याकरिता प्रथम ती शब्दसंपत्ती माहित असणे, ज्ञात असणे गरजेचे आहे.*

***Keywords***: *- Vocaculary, Marathi Language study, शब्दसंपत्ती*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक :—**

रा.गो.सराफ यांच्या मते,

‘‘ भाषा म्हणजे सांकेतिक परंतु मौखिक प्रतिकांचा आंतरव्यवहाराकरिता उपयोगात येणारा आकृतीबंध होय‘‘.

श्रवण, भाषण, वाचन व लेखन या भाषेच्या मुळ क्षमता होत. या टप्प्यांमधूनच भाषेचा विकास होत असतो. या सर्व क्षमतांच्या मुळाशी शब्दक्षमता ही एक उपक्षमता आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. शब्द म्हणजे अनुभूतीचे अमूर्त स्वरूप तर शब्दसंपत्ती म्हणजे मुलांच्या अध्ययनानुभवांचा समुच्चय होय. व्यक्ती भोषेचा उपयोग करताना वेगवेगळे शब्द प्रयोग करत असते. हे शब्द प्रयोग प्रसंगानुरूप केले जातात. आशयातील योग्य शब्द निवडून काढणे किंवा वारपणे यालाच शब्दनिष्ठ सर्जनशीलता असे म्हणतात.

शब्दनिष्ठ सर्जनशीलता ही समानार्थी व विरूध्दार्थी शब्दांचा उपयोग करणे, शब्द समूहासाठीएकच शब्द वापरणे, म्हणी व वाक्प्रचार यांचा वाक्यात योग्य वेळेस योग्य ठिकाणी वापर करणे या सर्वांशी निगडित असते. विद्यार्थ्याकडे जेवढी शब्दसंपत्ती अधिक असेल तेवढी शब्दनिष्ठ सर्जनशीलता अधिक असते.जर शब्दसंपत्ती विकसित झालेली असेल तर शब्दांचे अर्थ समजतील, त्यामुळे भावना समजतिल, भावना व्यक्त करता येतील.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची गरज :—**

शब्दसंपत्तीवर पभूत्त्व ही एक स्वतंत्र क्षमता आहे. विद्यार्थी शब्दांचा वापर करताना त्याच त्या तसेच साधे व मोजकेच शब्द वापरतात, नाविन्यता नसते, म्हणी, वाक्प्रचार यांचा उपयोग न करता अगदी साधे वाक्य लिहिण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. शब्दसंपदा संकलित करण्याच्या बाबतीत जर विद्यार्थी असाच उदासीन राहिला तर शब्दसंपत्तीच्या अभावामुळे विद्यार्थी स्वत:च्या विचारांना योग्य न्याय देऊ शकरणार नाही. म्हणून ज्ञानात्मक पातळीवर ही शब्दसंपत्ती किती प्रमाणात आहे हे तपासण्यासाठी अभ्यास करण्यात आला.

## संशोधनाचे महत्त्व :—

शब्दसंपत्तीच्या संदर्भातील संशोधनांचा विचार केल्यास पुढीलप्रमाणे माहिती मिळते,

स्मिथ त्यांच्यामते, वयाच्या आठराव्या महिन्यामध्ये बालकाजवळ ४४६ शब्द असतात तर सहाव्या वर्षापर्यंत २५६२ शब्द असतात. त्यांच्यामते समानार्थी व विरूध्दार्थी शब्द यातील संबंध लक्षात आणून दिल्याने शब्दसंपत्ती विकासास खूप महत्त्वाची मदत होते.

बेल्व्ही यांनी शहरी व ग्रामीण भागातील मुलांच्या शब्दसंपत्तीचा अभ्यास केला तेव्हा त्यांना असे आढळून आले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शब्दसंपत्तीचा विकास एक ते दिड वर्ष उशीरा होतो.

डॉ. पाटील एस. के. यांनी केलेल्या पीएच.डी च्या संशोधनामध्ये (१९८०) इ. तीसरीच्या विद्यार्थ्यांची अभिव्यक्तिची शब्दसंपत्ती २३०४ शब्द तर इ. चौथीच्या विद्यार्थ्यांची २९७२ शब्द इतकी आढळून आली.

डॉ. काथर्डेकर यांनी केलेल्या पीएच.डी च्या संशोधनामध्ये (१९८२) मौखिक व लेखन शब्दसंपत्तीची तुलना केली असता मुळशब्द मौखिक १३८४ व ५८०४ लिखित शब्दसंपत्ती मिळाली.

**न्यादर्श :—**

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील शहरी भागातून ११००, ग्रामीण भागातून २००० व आदिवासी भागातून २०० विद्यार्थ्यांची सूगम यादृच्छिक लॉटरी पध्दतीच्या सहाय्याने न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्व्हेक्षण पध्दतीतील संपादन परीक्षण पध्दतीचा उपयोग केला गेला.

**संशोधनाची कार्य पध्दती :—**

प्रस्तुंत संशोधनाचा अभ्यास हा अहमदनगर जिल्ह्यातील शहर, ग्रामीण व आदिवासी अशा तीन भागात व ज्ञानात्मक, आकलनात्मक व उपयोजनात्मक अशा तीन उद्दिष्टांच्या संदर्भात अभ्यास

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

करण्यात आला. तसेच या तीनही विभागात व तीनही उद्दिष्टांच्या स्तरावर मुले व मुली यांच्या संपादनाची तुलना करण्यात आली व निष्कर्ष काढण्यात आले.

**संशोधन साधन :—**

प्रस्तुत संशोधनासाठी संपादन चाचणी तयार करण्यात आली व त्या चाचणीच्या सहाय्याने माहिती एकत्रित केली गेली.

**शब्दसंपत्तीचे मापन :—**

१. शब्दसंपत्ती मोजण्यासाठी ती मूळ शब्द स्वरूपामध्ये मोजण्याचे निश्चित केले.


२. मूळशब्द म्हणजे ज्या शब्दाला कोणताही प्रत्यय लागलेला नाही असा शब्द.

शब्दसंपत्तीच्या ज्ञानात्मक पातळीवरील प्रभूत्त्वामध्ये भाषेतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद या प्रकारातील विविध शब्द विद्यार्थ्यांच्या स्मरणात असणे अपेक्षित आहे. हे स्मरण पडताळून पहाण्यासाठी अनेक प्रकारचे प्रश्न विचारले जाऊ शकतात. प्रस्तुत अभ्यासामध्ये ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीवरील संपादन तपासण्यासाठी चाचणीमध्ये ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीवरील संपादन तपासण्यासाठी चाचणीमध्ये समानार्थी शब्द लिहिणे व विरूद्धार्थी शब्द लिहिणे यांचा अंतर्भाव करण्यात आला. या प्रश्नांना मुले व मुली मिळून शहरी भागातील ८१८, ग्रामीण भागातील १६०० तर आदिवासी भागातील २०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. या प्रतिसादाचे विश्लेषण पुढील प्रमाणे.

**विभागवार विश्लेषण :—**

**ज्ञानात्मक पातळी— विकसित शब्दसंपत्ती — विभागवार विश्लेषण**

| विभाग | शेकडा संपादन पातळी |
|---|---|
| ग्रामीण विभाग | ३८.०५ |
| शहरी विभाग | ३८.९५ |
| आदिवासी विभाग | २५.६५ |




वरील विश्लेषणाचा विचार करता असे दिसते की,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*


१. शहरी व ग्रामीण विभागतील विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन सारखेच आहे. पण शहरी —आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील शब्दसंपत्तीवरील ज्ञानात्मक पातळीवरील संपादनात फरक आहे.

२. आलेखावरून असे दिसते की, शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाचा खालील ६० टक्के भाग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाच्या उजवी कडे आहे. याचा अर्थ शहरीभागातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील विद्यार्थ्यांचे ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा चांगले आहे. मात्र शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाचा वरील ४० टक्के भाग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आलेखाच्या डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी भागातील सर्वसामान्यापेक्षा वरच्या गटातील विद्यार्थ्यांचे ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा कमी आहे.

३. आदिवासी भागाचा आलेख मात्र शहरी व ग्रामीण भागातील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा आदिवासी भागातील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे ज्ञानात्मक पातळीवरील शब्दसंपत्तीचे संपादन कमी आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुले ज्ञानात्मक पातळीवर विकसित शब्दसंपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण विभाग | ३५.०० |
| शहरी विभाग | ४०.०० |
| आदिवासी विभाग | २५.०० |




वरील विश्लेषणाचा विचार करता असे दिसते की,

१. शहरी—ग्रामीण भागातील, शहरी—आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील मुलांच्या ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीमध्ये फरक आहे.

२. आलेखावरून असे दिसते की, शहरी भागातील मुलांच्या आलेखाचा खालील २० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलांच्या आलेखाच्या उजवीकडे आहे. याचा अर्थ शहरीभागातील


Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलांची ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलांच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा चांगली आहे. मात्र शहरी भागातील मुलांच्या आलेखाचा वरील ८० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलांच्या आलेखाच्या डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी भागातील सर्वसामान्यपेक्षा वरच्या गटातील मुलांची ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलांच्यापेक्षा कमी आहे.

३. शहरी व ग्रामीण भागातील मुलांच्यापेक्षा आदिवासी भागातील मुलांची ज्ञानात्मक पातळीवरील विकति शब्दसंपत्ती कमी आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुली ज्ञानात्मक पातळीवर विकसित शब्दसंपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण विभाग | ३५.०० |
| शहरी विभाग | ४०.०० |
| आदिवासी विभाग | २५.०० |




वरील विश्लेषणाचा विचार करता असे दिसते की,

१. शहरी—ग्रामीण भागातील, शहरी—आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील मुलींच्या ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीमध्ये फरक दिसून येतो.

२. शहरीभागातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलींची ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलींच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा चांगली आहे.

३. आदिवासी भागातील सर्वसामान्य गटातील मुलींची ज्ञानात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलींच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा चांगली आहे.

मुलभूत क्षमतांपैकी शब्दक्षमता या महत्त्वाच्या क्षमतेबद्दल अभ्यास करण्यासाठी म्हणून या अभ्यासाचा उपयोग नक्कीच होईल. वेगवेगळया विभागामध्ये शब्दसंपत्ती विकासात काय फरक आहे हे लक्षात येण्याकरिता, त्यास अनुसरून अध्ययन अनुभूतीच्या स्वरूपामध्ये काय बदल करणे अपेक्षित आहे हे लक्षात येण्याकरिता प्रस्तुत अभ्यासाचा उपयोग होईल.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संदर्भ :—**

*National Council of Educational research & Training Report of the Minimum Learning Committee, Department of Education, New Delhi*
*Singh,Bhoodev, (2004) Preschool Education, Delhi, APH Publishing Corporation,*
*Shrivastava,R,P, (2005) Reading Ability & School Achievement, Delhi, Commonwelth Publication*
*Dandekar,W,N, (1984), Evaluation in Schools, Pune, Shri Vidya Prakashan*
*शब्दसंपत्ती वारंवारिता सारणी (२००४) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ, पुणे*
*क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९९५, मराठी गणित (इ. १ ते ५) आणि सामाजिक विज्ञान (इ. ३ ते ५), (१९९८), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे*
*सेहनी चित्रा, (२००५), भाषिक कौशल्यांचा विकास, पुणे, नित्यनूतन प्रकाशन*
*मराठीचा भाषिक वापर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*
*मराठी बालभारती, इयत्ता पहिली ते पाचवी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ, पुणे*
*जगताप ह.ना. (२००५), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे, नित्यनूतन प्रकाशन*
*कदम चा.प. (२००५), शैक्षणिक संख्यासशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन*